# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH

Govt.Dental College & Hospital Building, St.George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax:+91-22-22620562/22652168 Website :http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/अल्पसंख्यांक/शिष्यवृत्ती/अल्पसंख्यांक/१-अ, दिनांक :१८/२/२००९

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम महाविद्यालये

**विषय : अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत.**

**संदर्भ : शासनाचे पत्र क्र. एमईडी१००९/प्र.क्र.५७/ ०९/ शिक्षण-२, दिनांक निरंक फेब्रुवारी, २००९.**

शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. अविवि- २००९/प्र.क्र.४६/०९/का-१, दिनांक ५/२/२००९ अन्वये शासनाने अल्पसंख्यांक समाजातील गरीब आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना व्यावसायिक तसेच तांत्रिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू केली आहे.

शिष्यवृत्तीची तपशीलवार माहिती, अर्जाचा नमूना, अर्ज करावयची पध्दती, पात्रता, अभ्यासक्रमांची यादी व विद्यार्थ्यांनी संस्थेमार्फत अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक इत्यादीची माहीती या संचालनालयाच्या **www.dmer.org** तसेच **www.mdd.maharashtra.gov.in or www.mdd.maharashtra.gov.in or www.dte.org.in or** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या व्यतिरीक्त या संबंधीचा अर्जाचा नमूना १) राज्य अल्पसंख्याक आयोग, २) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, ३) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, ४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांची कार्यालये, ५) सर्व सहसंचालक, संचालक तंत्रशिक्षण, संचालनालय यांची कार्यालये, ६) मिटकॉन तसेच या संचालनालयात सुध्दा उपलब्ध आहे.

तसेच सदर योजनेच्या अटी व शर्ती शासन निर्णयात नमूद करण्यात आल्या असून सदर अटी पूर्ण करणाऱ्या ते शिकत असलेल्या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाच्या वार्षिक शैक्षणिक शुल्काच्या ५०% किंवा रु. २५,०००/- यापेक्षा जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येणार आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांना सदरची शिष्यवृत्ती लागू करण्यात येणार आहे. शासन निर्णयातील

तरतूदीनुसार आपल्या महाविद्यालयातील सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत नमून्यात अर्ज प्राप्त करुन घ्यावेत आणि सदर अर्जांची आपल्या स्तरावर छाननी करुन त्यानंतरच शिष्यवृत्तीसाठी पात्र असणारे अर्ज या संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सीईटी कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारती समोर, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ या पत्त्यावर पाठवावेत.

या सर्व प्रक्रियेसाठी विहित कालावधी नमूद केलेला असून यामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांकडे अर्ज सादर करण्याकरीता **दिनांक २६ फेब्रुवारी २००९** अशी अंतिम दिनांक असून आपल्यामार्फत या संचालनालयाकडे अर्ज सादर करावयाची अंतिम **दिनांक ४ मार्च २००९** अशी आहे.

तरी या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या योजनेबाबत अवगत करुन द्यावे आणि सदर योजनेतंर्गत पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत नमुन्यात प्राप्त करुन त्यांची शहानिशा आपल्या स्तरावर करुन सदरचे अर्ज विहीत कालावधीत या संचालनालयाकडे सादर करावेत. तसेच उपरोक्त बाबत आपणास कोणतीही शंका अथवा अडचणी असल्यास आपण **या संचालनालयाशी दुरध्वनी क्रमांक -०२२-२२६५२२५७ - २२६५२२५९ संपर्क साधावा.**

**आपणास असेही कळविण्यात येते की, या योजनेमधील शिष्यवृत्तीचे अर्ज या संचालनालयाकडे दिनांक ४ मार्च २००९ पर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे. ही योजना प्रभावीरित्या राबविण्याकरीता आपल्या महाविद्यालयातील एका जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. याबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार या संचालनालयास प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येईल व तसे अल्पसंख्यांक विभागास कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**सही/-**
**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.**

प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर :

१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महापालीका मार्ग, मुंबई - ४०० ००१.